CNR NO. MHSO07-000065-2019

<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५/२०१९ मधील निशाणी क्रमांक ३६ वरील आदेश</u>

**(चित्रा विरुध्द बजरंग)**

**१.** प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तुत अर्जात रे.मु.नं.२२१/२०१० च्या दाव्याचे निकालाची संगणकीकृत प्रत दाखल करुन तीस निशाणी क्रमांक देवुन पुराव्यात वाचण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

**२.** प्रस्तुत अर्जावर वादीचे अधिवक्त्याने म्हणणे देवुन सदर अर्ज खरा, कायदेशीर नसल्यामुळे रद्द करण्याची विनंती केली आहे.

**३.** निशाणी क्र.३६ वरील प्रस्तुत अर्ज व त्यावरील वादीचे अधिवक्त्याने दिलेले उत्तर वाचले. वादी व प्रतिवादी क्र.१ च्या विव्दान अधिवक्त्यांचा युक्तिवाद ऐकला.

**४.** वादीने प्रस्तुत दावा निरंतर ताकीद मिळणेकरिता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने रे.मु.क्र.२२१/२०१० या दाव्याची संगणकीकृत प्रत दाखल केलेली आहे. सदर कागदपत्र ही प्रस्तुत दाव्याचा गुणागुणांवर निकाल होण्याकरिता अभिलेखावर दाखल करुन त्यास निशाणी नंबर देणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरिता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१) प्रतिवादी क्र.१ यांना प्रस्तावित कागदपत्र अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मंजुर करण्यात येते व त्यास निशाणी देण्याची निर्देश संबंधीत लिपीकास देण्यात येते.

२) प्रस्तुत अर्ज येणेप्रमाणे निकाली काढण्यात येतो.

दिनांकः– ०८.०२.२०२१.

(प्र.प्र. देशमुख)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर पंढरपुर

CNR NO. MHSO07-000065-2019

***CERTIFICATE***

*I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.*

| | | |
|---|---|---|
| *Name of Stenographer* | : | *A.K. Vibhute* |
| *Court* | : | *Jt. Civil Judge, Junior Divison, Pandharpur* |
| *Date* | : | *08.02.2021.* |
| *Order signed by the Presiding Officer on* | : | *08.02.2021.* |
| *Order uploaded on* | : | *09.02.2021.* |